नियमित फौ. ख. क्र. १११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखर
नि.क्र. १८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अनिल नागोजी रोकडे,
वय ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – भागेबोरी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. दि.१४.०४.२०२४ रोजी पोलीसांनी मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला नि.क्र.१६ वरील पंचनामा समन्स दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी माझ्या घराच्या बाजुला असलेल्या ठिकाणी पोलीसांसोबत गेलो तेथे पोलीसांनी पंचनामा केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मी वाचला नव्हता त्यामुळे मला माहित नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.१९** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०४.२०२४ रोजी पोलीसांनी मला शिवाजी लेआऊट येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे

म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष चौकशी केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. आता मला पुन्हा दाखविलेला पंचनाम तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी चरणजीतसींग अरोरा यांच्याकडे दिवानजी म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व चरणजीतसींग यांनी एकाचवेळी पंचनाम्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी शिवाजी लेआऊट येथे जाऊन सही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, चरणजीतसींग अरोरा यांनी सही केल्यामुळे मी ही सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावर सही करताना मी तो पंचनामा वाचला नव्हतो पोलीसांनी सांगितल्यामुळे मी सही केली व चरणजीतसींग यांनी सही केली. मी काम करीत असलेल्या दुकानासमोरुन उत्तर दक्षिण सिमेंट रोड गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याच्या उत्तरेला शिवाजी लेआऊट आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याच्या पलीकडे असलेल्या घरी जाऊन मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २१.०३.२०२५

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.